13 JUL 2026

पुण्यनगरी

# प्रा. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोगे : शिवाजी विद्यापीठातील डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने ज्येष्ठ समाजवादी नेते व लोकनेते प्रा. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्रा. एन. डी. पाटील आणि सामाजिक चळवळी या विषयावर बुधवार, दि. १५ रोजी सकाळी ११.३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानासाठी ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ (सातारा) हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत, तर प्रसिद्ध शाहीर रंगराव पाटील (कोल्हापूर) यांचे शाहिरी सादरीकरणही होणार आहे.

कार्यक्रमास सरोज (माई) पाटील, तसेच शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) ज्योती जाधव असतील. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाने केले असून, समन्वयक प्रा. (डॉ.) रणधीर शिंदे आणि मराठी विभागाचे प्राध्यापक प्रा. (डॉ.) नंदकुमार मोरे यांनी विद्यार्थी, संशोधक, शिक्षक आणि सामाजिक चळवळींमध्ये कार्यरत असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.